MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

mcaer@rediffmail.com ०२०-२५५२८२०८ www.mcaer.org

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४१२२/४९९/२२३२ दि.०९ जुलै,२०२६

## जाहीर सूचना

**राज्यातील चार कृषि विद्यापीठे किंवा कृषि परिषद किंवा राज्य शासनाची मान्यता नसलेल्या कृषि संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्था (विद्यालये किंवा महाविद्यालये) मधील पदविका, कृषि व संलग्न पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी या अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत महाराष्ट्र राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी. एससी. (ऑनर्स) कृषी पदवी, बी. एससी. (ऑनर्स) उद्यानविद्या पदवी, बी. एससी. (ऑनर्स) वनविद्या पदवी, बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) पदवी, बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एससी. (ऑनर्स) सामुदायिक विज्ञान पदवी, बी.टेक्. (जैवतंत्रज्ञान) पदवी, बी.एफ्.एस्सी. (मत्स्यविज्ञान) पदवी आणि बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) पदवी या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

तसेच कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका (मराठी माध्यम- २ वर्षे कालावधी), कृषी तंत्रनिकेतन (पुर्ण इंग्रजी माध्यम- ३ वर्षे कालावधी) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया कृषी विद्यापीठांमार्फत केंद्रिभूत पध्दतीने राबविण्यात येत आहे. या सर्व उपरोक्त कृषी विषयक अभ्यासक्रमांना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे / महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांची मान्यता असणे आवश्यक आहे. कृषी परिषदेच्या **www.mcaer.org** या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या कृषी पदविका, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांची यादी उपलब्ध आहे. तसेच या संस्थांमार्फत सर्व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेश देत असताना प्रवेश माहिती पुस्तिकेत अभ्यासक्रम विद्यालये आणि महाविद्यालयांची माहिती प्रसिध्द केली जाते.

करिता असे नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण

यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात कृषी शिक्षणासाठी अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यासक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील कलम ९ मध्ये ''राज्यामध्ये कोणतेही कृषित्तर विद्यापीठ स्थापन करण्याशी संबंधित कोणत्याही अधिनियमांमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, असे कोणतेही विद्यापीठ कृषी विषयातील कोणतेही पदवीका, प्रमाणपत्र किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी देण्यास सक्षम असणार नाही.'' तथापी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक मात्र कृषि विषयातील पदवीका प्रमाणपत्र देण्यास सक्षम आहे. असे नमुद करण्यात आलेले आहे.

या अनुषंगाने व्यावसायिक/ अव्यावसायिक कृषि व संलग्न अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थीवर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात राज्य शासन / महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे / महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली ह्या सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / विद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेली विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी अमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे, असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी राज्य शासन, कृषि विद्यापीठे व कृषी परिषदेकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत शैक्षणिक संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता व संलग्नता तपासून घ्यावी. तसेच कृषि विद्यापीठ / कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर संबंधित कृषि व संलग्न महाविद्यालयाचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील विद्यालये / महाविद्यालये / विद्यापीठाच्या मान्यतेबाबत कृषी परिषदेशी किंवा चार कृषी विद्यापीठांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४१२२/४९९/२२३२
दिनांक-०९ जुलै, २०२६

**(किशोर शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा संचालक शिक्षण,**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.**